## सामान्य प्रशासन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ जून १९७७

**भारताचे संविधान**

क्रमांक इएक्सएम-२१७६-सतरा.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे मिळालेल्या शक्तींचा वापर करून या बाबतीत काढण्यात आलेले व राज्यामध्ये किंवा त्याच्या कोणत्याही भागामध्ये अंमलात असलेले सध्याचे सर्व नियम व आदेश यांचे अधिक्रमण करून, महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे महाराष्ट्र राज्याच्या दुय्यम मंत्रालयीन सेवेत नियुक्त केलेल्या निम्नस्तरीय लिपिकांकरिता सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षेसाठी पुढील नियम तयार करीत आहेत, ते असे :—

### नियम

१. **संक्षिप्त नाव व प्रारंभ.**—(१) या नियमांस "महाराष्ट्र शासन दुय्यम मंत्रालय सेवा (निम्नस्तर लिपिक) सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा नियम, १९७७" असे म्हणावे.

(२) हे नियम १ जून १९७७ रोजी अंमलात आल्याचे समजण्यात येईल. नियम ६, खंड (२) हा १ नोव्हेंबर, १९७७ रोजी अंमलात आल्याचे समजण्यात येईल.

२. **व्याख्या.**—या नियमांत, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर—

(अ) "परिशिष्ट" म्हणजे या नियमांचे परिशिष्ट.

(ब) "आयोग" म्हणजे महाराष्ट्र लोकसेवा आयोग.

(क) "परीक्षा" म्हणजे परिशिष्ट "अ" मध्ये विहित केलेल्या पाठ्यक्रमानुसार निम्नस्तरीय लिपिकांकरिता घेण्यात येणारी सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा.

(ड) सध्या अस्तित्वात असलेले नियम म्हणजे हे नियम राजपत्रात प्रसिद्ध होण्याच्या दिनांकाच्या निकटपूर्वी निम्नस्तरीय लिपिकांकरिता सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षांसाठी अंमलात असलेले नियम व आदेश.

(ई) "राजपत्राचा दिनांक" म्हणजे ज्या राजपत्रामध्ये हे नियम प्रसिद्ध झाले असतील त्या राजपत्राचा दिनांक.

(फ) "निम्नस्तरीय लिपिक" म्हणजे आयोगाने निवड केल्यानंतर दुय्यम मंत्रालय सेवेत लिपिक किंवा टंकलेखक किंवा लिपिक-टंकलेखक या पदासाठी थेट नियुक्त केलेली व्यक्ती होय आणि त्यात मंत्रालयीन विभागातील वर्ग चारमधून, लिपिक किंवा टंकलेखक किंवा लिपिक-टंकलेखक म्हणून पदोन्नती दिलेल्या व्यक्तीचा आणि शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक इएक्सएम्-१०७४-क्यू, दिनांक १ मार्च १९७४ या अन्वये लिपिक किंवा टंकलेखक किंवा लिपिक-टंकलेखक या पदावरील जिची नियुक्ती नियमित केली आहे अशा व्यक्तीचा अंतर्भाव होतो.

३. **कालावधी आणि संधीची संख्या.**—या नियमांच्या अधीन राहून प्रत्येक निम्नस्तरीय लिपिकाने त्याची निम्नस्तर लिपिक म्हणून नियुक्ती झाल्याच्या दिनांकापासून ४ वर्षांत आणि ३ संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

मात्र असे की, एखाद्या टंकलेखकाने किंवा लिपिक-टंकलेखकाने फक्त टंकलेखनाच्या कामाचा पर्याय स्वीकारला असेल आणि मंत्रालयीन विभागात सहायकाच्या पदासाठी त्याच्या नावाचा विचार होऊ नये असे त्याने लेखी कळवले असेल तर त्याने ही परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक नाही.

४. **राजपत्राच्या दिनांकापूर्वी नियुक्त केलेल्या व्यक्तींकरिता कालावधी व संधींची संख्या.**—या नियमांच्या अधीन राहून, राजपत्राच्या दिनांकापूर्वी निम्नस्तरीय लिपिक म्हणून नियुक्ती झालेल्या व सध्या अस्तित्वात असलेल्या नियमान्वये परीक्षा उत्तीर्ण न झालेल्या व्यक्तीने, तिला परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून नियम ६ अन्वये सूट दिलेली नसेल तर राजपत्राच्या दिनांकापासून ३ वर्षांच्या आत आणि २ संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

४-अ. महाराष्ट्र शासन दुय्यम मंत्रालय सेवा (निम्नस्तरीय लिपिक) सेवा प्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा (सुधारणा) नियम, १९७८ च्या प्रारंभाच्या तारखेस एखादी व्यक्ती, टंकलेखक किंवा लिपिक-टंकलेखक म्हणून काम करीत असेल तर त्या व्यक्तीने तिला नियम ६ खाली परीक्षा उत्तीर्ण होण्यामध्ये सूट दिली नसल्यास, त्या तारखेपासून ४ वर्षांच्या आत आणि ३ संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

५. **परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास होणारे परिणाम.**—एखादा निम्नस्तरीय लिपिक नियम ३ व ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत आणि संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण झाला नाही तर पुढील परिणाम होतील :—

(अ) तो परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत किंवा नियम ६ च्या पोट-नियम (२) अन्वये परीक्षेतून त्यास सूट मिळेपर्यंत त्याला निम्नस्तरीय लिपिकाच्या पदावर कायम करण्यात येणार नाही किंवा निम्नस्तरीय लिपिकाच्या वेतनमानातील पुढील वेतनवाढ काढण्यास परवानगी देण्यात येणार नाही. अशा रीतीने रोखून ठेवलेली वेतनवाढ ही, तो परीक्षा उत्तीर्ण झाल्याच्या दिनांकापासून किंवा त्याला परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून नियम ६ च्या पोट-नियम (२) अन्वये सूट देण्यात आल्याच्या दिनांकापासून त्याला देय असेल आणि कोणतीही वेतनवाढ रोखून न धरल्याचे समजून पुढील सर्व वेतनवाढी देण्यात येतील. पूर्वीच्या काळाबद्दल थकबाकी देय नसेल आणि (ब) त्याला निम्नस्तरीय संवर्गातील आपली ज्येष्ठता गमवावी लागेल म्हणजेच जे निम्नस्तर लिपिक त्याच्या अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाले असतील त्या सर्व लिपिकांखाली त्याचा ज्येष्ठताक्रम लागेल तसेच, अशा ज्या लिपिकांखाली त्याचा ज्येष्ठताक्रम लागेल त्या लिपिकांना ज्येष्ठ असणाऱ्या आणि त्याच्या नंतर परंतु नियम ३ व ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत व संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या लिपिकांच्या देखील खालचा ज्येष्ठताक्रम त्याला देण्यात येईल.

६. **परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून सूट.**—(१) राजपत्राच्या दिनांकापूर्वी नियुक्ती झालेल्या निम्नस्तरीय लिपिकास परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून पुढील प्रकरणी सूट देण्यात येईल :—

(एक) त्यास यापूर्वीच निम्नस्तरीय लिपिक म्हणून कायम करण्यात आले असेल अशा प्रकरणी किंवा,

(दोन) तो सध्या अस्तित्वास असलेल्या नियमान्वये यापूर्वीच परीक्षा उत्तीर्ण झाला असेल अशा प्रकरणी किंवा,

(तीन) त्यास वाटपप्राप्त शासकीय कर्मचारी नियमांन्वये १ नोव्हेंबर १९५६ रोजी निम्नस्तरीय लिपिक म्हणून सामावून घेतले असेल अशा प्रकरणी किंवा,

(चार) त्यास परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून सध्या अस्तित्वास असलेल्या नियमान्वये सूट देण्यात आली असेल अशा प्रकरणी.

(२) १ नोव्हेंबर १९७७ रोजी किंवा त्यानंतरच्या कोणत्याही दिनांकास निम्नस्तरीय लिपिक ४५ वर्षे वयाचा झाल्यानंतर त्यास परीक्षा उत्तीर्ण होण्यामधून सूट देण्यात येईल.

मात्र असे की, नियम ५ च्या खंड (ब) च्या तरतुदींमुळे त्याने गमावलेली ज्येष्ठता, अशी सूट मिळाल्यामुळे पुनः मिळणार नाही.

७. **परीक्षा केव्हा घेण्यात येईल.**—परीक्षा सर्वसाधारणपणे, वर्षातून एकदा मे किंवा जून महिन्यात मराठीत किंवा इंग्रजीमध्ये किंवा दोन्ही भाषांत घेण्यात येईल.

८. **परीक्षा घेण्यात न झाल्यास त्याचे होणारे परिणाम.**—जर कोणत्याही कारणास्तव, एखाद्या वर्षी परीक्षा घेण्यात आली नाही तर या नियमातील नियम ३ व ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीची संगणना करताना ते वर्ष वगळण्यात येईल.

९. **परीक्षेला बसण्याकरिता संधी.**—नियम ५ मधील तरतुदींना अधीन राहून, निम्नस्तरीय लिपिकाला परीक्षेला बसण्याकरिता कितीही वेळा संधी मिळू शकेल.

१०. **पाठ्यक्रम.**—परीक्षेकरिता असलेला पाठ्यक्रम व प्रत्येक प्रश्नपत्रिकेकरिता असलेले एकूण गुण परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे असतील किंवा राज्य शासन वेळोवेळी आदेशानुसार सूचना देईल असे इतर विषय असतील.

११. **उत्तीर्ण होण्याचे मानक.**—परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक प्रश्नपत्रिकेमध्ये एकूण गुणांच्या ५० टक्के गुण हे मानक असेल.

१२. **कोणत्याही प्रश्नपत्रिकेस बसण्यामधून सूट.**—कोणत्याही परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या उमेदवाराने कोणत्याही प्रश्नपत्रिकेत ५५ टक्के किंवा त्याहून अधिक गुण मिळवले असल्यास त्या उमेदवाराला त्यानंतरच्या त्याच्या प्रयत्नात त्या प्रश्नपत्रिकेला बसण्यामधून सूट मिळेल.

१३. **विशेष योग्यता.**—एखादा निम्नस्तरीय लिपिक पहिल्याच प्रयत्नात परीक्षा उत्तीर्ण झाला असेल आणि त्याने कोणत्याही प्रश्नपत्रिकेत ७० टक्के किंवा त्याहून अधिक गुण मिळवले असतील तर त्या प्रश्नपत्रिकेतील त्याच्या विशेष योग्यतेबद्दलची नोंद गोपनीय अहवालात घेण्यात येईल.

१४ **प्रशिक्षण वर्ग.**—(१) परीक्षेला बसू इच्छिणाऱ्या उमेदवारांना प्रशिक्षण देण्याकरिता परीक्षेच्या दिनांकापूर्वी कमीत कमी एक महिना अगोदर शासनातर्फे प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात येतील. त्या प्रशिक्षण वर्गात परिशिष्ट (ब) मध्ये दर्शविलेल्या विषयांवर सोळा व्याख्याने देण्यात येतील.

(२) प्रशिक्षण वर्गात उपस्थित राहणे वैकल्पिक असेल. ते अनिवार्य असणार नाही.

(३) निम्नस्तरीय लिपिकाला प्रशिक्षण वर्गाचा फक्त एकदाच लाभ घेता येईल आणि त्यासाठी व परीक्षेला प्रवेश मिळवण्यासाठीही तो अर्ज करील. तो हा अर्ज, त्याला ज्या वर्षाकरिता या सोयीचा लाभ घ्यावयाचा असेल किंवा परीक्षेला बसावयाचे असेल किंवा दोन्ही करावयाचे असेल त्या वर्षाच्या, १ फेब्रुवारीपूर्वी परिशिष्ट "क" मधील नमुन्यात लेखी स्वरुपात करील. हा अर्ज शासनाचे सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांना उद्देशून लिहिण्यात येईल आणि ते उमेदवाराने अर्जात विनिर्दिष्ट केल्यानुसार त्याला (अ) प्रशिक्षण वर्गासाठी आणि (ब) परीक्षेसाठी प्रवेश दिला आहे किंवा कसे ते कळवण्याची व्यवस्था करतील.

(४) ज्या व्यक्तीला प्रशिक्षण वर्गात प्रवेश देण्यात आला असेल अशा व्यक्तीस संबंधित विभाग वर्गात उपस्थित राहण्यासाठी आवश्यक ती सवलत देईल.

## परिशिष्ट 'अ'

(पहा नियम १०)

### मंत्रालयीन विभागातील निम्नस्तरीय लिपिकांकरिता घेण्यात येणाऱ्या सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षेसाठी पाठ्यक्रम

| प्रश्नपत्रिका—विषय | प्रश्नपत्रिकेचा कालावधी | गुण |
|---|---|---|
| **प्रश्नपत्रिका एक** | | |
| (एक) सचिवालयाची रचना .. .. | | |
| (दोन) कार्य नियमावली .. .. | | |
| (तीन) सचिवालयीन अनुदेश .. .. | २ तास .. | १०० |
| (चार) आवक लिपिक, गोपनीय लिपिक, रजुवात लिपिक आणि जावक लिपिक यांची कर्तव्ये. | | |
| (पाच) महाराष्ट्र विधानमंडळ .. .. | | |
| **प्रश्नपत्रिका दोन** | | |
| (एक) सर्वसाधारण कार्य लिपिकाची कर्तव्ये .. | २ तास .. | १०० |
| (दोन) कार्यालयीन कार्यपद्धतीची नियमपुस्तिका (प्रकरण १ ते ५, ७ ते ११ आणि १४). .. | ... | ... |

https://mahasdb.maharashtra.gov.in/CGE/ddo/detailReportGroupWise.do



## परिशिष्ट 'ब'

### प्रशिक्षणविषयक तपशील

| विषय | व्याख्यानांची संख्या |
|---|---|
| (१) सचिवालयाची रचना .. .. .. .. <br>(२) कार्य नियमावली .. .. .. .. <br>(३) आवक लिपिक, गोपनीय लिपिक, रुजवात लिपिक आणि जावक लिपिक यांची कर्तव्ये. <br>(४) सचिवालयीन अनुदेश .. .. .. .. <br>(५) महाराष्ट्र विधानमंडळ .. .. .. .. <br>(६) सर्वसाधारण कार्य लिपिकाची कर्तव्ये .. .. .. | १६ |
| (७) कार्यालयीन कार्यपद्धतीची नियम पुस्तिका (प्रकरण १ ते ५, ७ ते ११ आणि १४). | १६ |
| एकूण .. | ३२ |

## परिशिष्ट 'क'

### नियम १४ (पहा)

निम्नस्तरीय लिपिकांकरिता घेण्यात येणाऱ्या (अ) सेवाप्रवेशोत्तर परीक्षेसाठी आणि (ब) प्रशिक्षण वर्गात प्रवेश घेण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना.

#### भाग एक

(१) अर्जदाराचे नाव (संपूर्ण नाव) ..

(२) विभाग .. ..

(३) निम्नस्तरीय लिपिक म्हणून नियुक्ती झाल्याचा दिनांक.

(४) ज्या वर्षी अर्जदार परीक्षेला बसू इच्छितो ते वर्ष.

(५) एखाद्या प्रश्नपत्रिकेत अर्जदाराला नियम १२ अन्वये सूट मिळालेली आहे काय ?



CGE 11/9/2017

जर उत्तर होकारार्थी असेल तर पुढील तपशील भरावा :—

(अ) कोणत्या वर्षी परीक्षेला बसला होता ?

(ब) आसन क्रमांक

(क) ज्या प्रश्नपत्रिकेतून सूट मिळाली आहे ती प्रश्नपत्रिका.

(ड) मिळविलेल्या गुणांची टक्केवारी

### भाग दोन

(ज्यांना परीक्षापूर्व प्रशिक्षण सवलतीचा लाभ घ्यावयाचा आहे फक्त अशा उमेदवारांनीच भरावयाचा)

१. मी परीक्षापूर्व प्रशिक्षण सवलतीचा लाभ घेऊ इच्छितो.

२. मी असे जाहीर करतो की, यापूर्वी मी अशा प्रशिक्षण सवलतीचा लाभ घेतलेला नाही.

दिनांक :

अर्जदाराची सही.

(उमेदवाराच्या विभागाच्या वापराकरिता)

### भाग तीन

अर्जदाराने भाग एकच्या बाब क्र. ३ व ५ मध्ये आणि भाग दोनच्या बाब क्रमांक-२ मध्ये भरलेला तपशील पडताळून पाहिला आणि तो अचूक असल्याचे आढळून आले.

क्रमांक :

दिनांक :

कार्यासन अधिकारी,

कार्यासन क्रमांक........

..............विभाग

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

व्ही. टी. चारी,

शासनाचे सचिव.